**प्रेसनोट** दि. २४/१०/२०२४

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून पुणे ग्रामीण पोलीस घटकातील शिरुर पोलीस ठाण्यामधील श्रेणी पोलीस उप निरीक्षक व खाजगी इसम यांचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | शिरुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. ८९०/२०२४. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ, १२ अन्वये. |
| तक्रारदार | स्त्री, वय ५० वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) माणिक बाळासाहेब मांडगे, पद- श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, शिरुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. (वर्ग-३)<br>२) सुभाष मुंजाळ, रा. कवठे यमाई, ता. शिरुर, जि. पुणे (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५,०००/- (पंचविस हजार) रुपये |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | १०,०००/- (दहा हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | दि. ०९/०९/२०२४ रोजी |
| ठिकाण | टाकळी हाजी पोलीस चौकी, ता. शिरुर, जि. पुणे. |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या मुलाचे विरुद्ध शिरुर पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये अटक न करण्यासाठी तसेच त्याला गुन्ह्यात मदत करण्यासाठी लोकसेवक माणिक मांडगे यांनी तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक माणिक मांडगे यांनी तक्रारदार यांचे मुलावर दाखल असलेल्या गुन्ह्यात अटक न करण्यासाठी आणि गुन्ह्यात मदत करण्यासाठी तक्रारदार यांना सुभाष मुंजाळ (आरोपी क्र.२) याचेशी बोलण्यास सांगितले. खाजगी इसम सुभाष मुंजाळ यांने तक्रारदाराकडे साहेबांना देण्यासाठी म्हणून १०,०००/- (दहा हजार) रुपये लाच मागणी केली व त्यास लोकसेवक माणिक मांडगे यांनी दुजोरा देवून त्यांनी सुद्धा १०,०००/- (दहा हजार) रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने आज दि. २४/१०/२०२४ रोजी लोकसेवक माणिक मांडगे व खाजगी इसम सुभाष मुंजाळ यांचेवर शिरुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

24/10/24

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner